# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ.

## महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**डॉ. एस. एम. रोकडे**
संचालक (प्र.)

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली – ४४२६०५(महा.)
फोन:०७१३२.२१६५५४, २२३१०४ फॅक्स– ०७१३२.२२२६५१
Email : bcud.gondwanauniversity@gmail.com
web:gondwana.digitaluniversity.ac , www.unigug.org


क्र/गों.वि./बी.सी.यु.डी./३८३ /२०१५ दिनांक : ०९ /१० /२०१५

प्रति,

मा. प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय** :– अकृषी विद्यापीठे व संग्नीत महाविद्यालयातील अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे व प्राचार्यांचे वय ६२ वरून ६५ वर्षे करण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सुधारित निवृत्तीवेतन प्राधिकृत करण्याची कार्यपद्धती ठरविण्याबाबत.

**संदर्भ** :– मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय/सेनिवे ६०–६२/२०१५/विशि–६/९३८५ दि. २३ सप्टेंबर, २०१५.

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये कळविण्यात येते की, महाविद्यालयीन अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे करण्याबाबतच्या निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे संबंधित अध्यापकांचे निवृत्तीवेतन व इतर लाभ प्राधिकृत करण्यामध्ये मा. महालेखापाल कार्यालयास येत असलेल्या अडचणीबाबत मार्गदर्शन करण्याकरिता व या संदर्भातील शासनाचे धोरण ठरविण्याकरिता मा. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३.०८.२०१५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सेवानिवृत्तीचे वय ६० वरून ६२ वर्षे झालेल्या अध्यापकांची माहिती खाली दिलेल्या फॉरमॅटमध्ये सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

| अ. क्र. | अध्यापकाचे नाव | महाविद्यालय /विद्यापीठाचे नाव | शासनाचे अपात्र ठरविलेले असल्यास शासन आदेश क्रमांक व दिनांक | मा. न्यायालयाने पात्र ठरविले असल्यास त्याबाबतचा तपशिल. | संबंधित अध्यापक निवृत्त होऊन सेवानिवृत्तीचे सर्व लाभ घेतलेले असल्यास व त्यांना पुन्हा नियुक्ती दिलेली आलेली आहे काय | संबंधित अध्यापक केव्हा सेवानिवृत्त होणार आहेत किंवा झाले आहेत. | संबंधित अध्यापकांच्या सेवेत खंड पडला असल्यास खंडाचा कालावधी व त्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

करिता संदर्भीय पत्राचे अवलोकन करून उपरोक्त फॉरमॅटमध्ये आपल्या महाविद्यालयाची माहिती पाठवावी.

कळावे.

सहपत्र :– संदर्भ पत्र.

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१
Web:www dhepune.gov.in E-Mail- vishi.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७ २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३


क्रमांक- युएनआय/सेनिवे/६०-६२/२०१५/विशि-६ / 9385 दिनांक- सप्टें.२०१५
23 SEP 2015

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

२.परीक्षा नियंत्रक
सर्व अकृषि विद्यापीठे
महाराष्ट्र राज्य.

**विषय- अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६२ वर्षे व प्राचार्यांचे वय ६२ वरुन ६५ वर्षे करण्याच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर सुधारित निवृत्तीवेतन प्राधिकृत करण्याची कार्यपध्दती ठरविण्याबाबत.**

संदर्भ- १.शासनाचे क्रमांक संकीर्ण२०१५/प्र.क्र.११/१५/विशि-१
दिनांक ५ ऑगस्ट, २०१५

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्राची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावी.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, अकृषि विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील अध्यापकांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचे वय ६० वरुन ६२ वर्षे करण्याबाबतच्या निर्णयाच्या अंमलबजावणीमुळे संबंधित अध्यापकांचे निवृत्तीवेतन व इतर लाभ प्राधिकृत करण्यामध्ये मा.महालेखापाल कार्यालयास येत असलेल्या अडचणीबाबत मार्गदर्शन करण्याकरिता व या संदर्भातील शासनाचे धोरण ठरविण्याकरिता मा प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०३.०८.२०१५ रोजी बैठक झाली.

सदर बैठकीमध्ये खालील तक्त्यात नमूद केलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबतचे आदेश दिलेले आहेत.

१.ज्या अध्यापकांना न्यायालयीन निर्णयाच्या आधारे वाढविलेल्या वयाचा लाभ देण्यात आला आहे, त्यांची प्रकरणनिहाय माहिती. ज्यामध्ये शासनाने अपात्र ठरवूनही न्यायालयाने पात्र ठरविलेल्या प्रकरणांची प्रकरणनिहाय माहिती.

२.सदर अध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याचे प्रस्ताव हे आपल्या विद्यापीठाकडून शिफारस करुन प्राप्त होत असतात. तसेच सदर प्रस्तावावर शासनाकडून अंतिम निर्णय होण्यापुर्वीच नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती होऊन निवृत्ती वेतन, अंशराशीकरण तसेच उपदानाचा लाभ संबंधित अध्यापकांना देण्यात आलेले आहेत, त्यामुळे ज्या अध्यापकांना पुन्हा नियुक्ती देण्यात आलेली आहे, अशा अध्यापकांची यादी व त्यांना अदा केलेली रक्कम त्यांनी शासनाकडे परत केलेली आहे किवा कसे, तसेच सदर अध्यापक केव्हा सेवानिवृत्त होणार आहेत किंवा झाले आहेत.

३.सदर अध्यापकांच्या सेवेत खंड पडला असल्यास खंडाचा कालावधी व त्याची कारणे याची प्रकरणनिहाय माहिती.

सदरची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यात सादर करावी. **सदरची माहिती प्रत्येक अधिव्याख्यात्यांनिहाय स्वतंत्र दर्शविण्यात यावी. सदरची माहिती दोन दिवसात या संचालनालयास ई-मेल व्दारे सादर करण्यात यावी.**

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत-१. मा .श्री. हर्षवर्धन तु जाधव, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव सादर.
२.सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांना माहिती व कार्यवाहीसाठी.
२/- त्यांना कळविण्यात येते की, विषयांकित माहिती आपण विद्यापीठाकडून प्राप्त करुन घ्यावी तसेच दिनांक २९ सप्टेंबर, २०१५ रोजी पुणे येथे होणाऱ्या बैठकीच्या वेळेस समक्ष घेऊन यावी.